'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
Vol. 2 Issue. 1
ISSN :2348-7143 (Online)
Jan.- March - 2015

# मध्ययुगीन मराठी कविता आणि मराठी चित्रपटगीते यांचा अनुबंध

**प्रा. धनराज तोताराम धनगर**
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
म.स.गा.महाविद्यालय, मालेगाव कॅम्प,
जि. नाशिक, महाराष्ट्र, भारत.

*मध्ययुगीन मराठी कवितेचे स्वरुप पाहता त्यामध्ये ओवी, अभंग, पद, आरती, स्तोत्र, विरहीणी, गौळण, भारुड, भुपाळी, श्लोक, आख्यानकाव्य, लावणी, पोवाडा, कटाव, फटका, झगडा (जुगलबंदी) असे कवितेचे विविधांगी स्वरुप आढळते. मध्ययुगीन मराठी कवितेच्या या विविधांगी स्वरुपाचे आकर्षण मराठी जनांना आणि मनांना कायम राहिलेले आहे. आजही कीर्तन, लावणी आणि पोवाड्यांच्या कार्यक्रमांना मराठी माणूस भरभरुन प्रतिसाद देतांना दिसतो. आधूनिक काळातील मराठी चित्रपटांमधूनदेखील आवर्जून हे उपरोक्त गीतप्रकार वापरले गेलेले दिसतात. या पार्श्वभूमीवर मध्ययुगीन मराठी कविता आणि मराठी चित्रपटगीते यांच्यातीलअसणारेअनुबंधात्मक नाते शोधणे उद्बोधक ठरेल.*

मध्ययुगीन मराठी काव्यात संत, पंत आणि शाहीरांच्या रचना महत्त्वपूर्ण ठरलेल्या आहेत किंबहुना मध्ययुगीन मराठी कविता म्हटली की संत, पंत आणि तंत काव्य असेच वर्णन केले जाते. मध्ययुगीन काळात मुद्रणाचा शोध लागलेला नसल्याने हे काव्य बहुतांश स्वरूपात मुखोद्गत करूनच जतन केले गेले. अर्थातच एक प्रकारची लय आणि गेयता या कवितेला स्वयंसिद्धच लाभलेली होती असे दिसते. कविता आणि गीते यांच्यातील महत्त्वाचे साधर्म्य म्हणून गेयता ही बाब लक्षात घ्यावी लागते. मध्ययुगीन मराठी कविता आणि मराठी चित्रपटगीते यांच्यातील असणारा अनुबंध हा आशय आणि अभिव्यक्ती या दोन प्रमुख मुद्यांच्या आधारे तपासता येईल.

**१. मध्ययुगीनमराठी कविता आणि मराठी चित्रपटगीते यांच्यातील आशयाचा अनुबंध :**

**अ)** भक्ती आणि अध्यात्मवर्णन आणि समाजप्रबोधन,

**ब)** प्रेम आणि सौंदर्यवर्णन.

**क)** शौर्य आणि इतर कथात्मवर्णन उदा. ऐतिहासिक, पोराणिक आशय इ.

**२. मध्ययुगीनमराठी कविता आणि मराठी चित्रपटगीते यांच्यातील अभिव्यक्तीचा अनुबंधः**

**अ)** ओवी, अभंग, पद,

**ब)** आरती, स्तोत्र, भूपाळी,

**क)** विरहीणी, गौळण, लावणी, कटाव, फटका, झगडा (जुगलबंदी)

**ड)** भारूड,

**इ)** श्लोक,

**ई)** आख्यानकाव्य, पोवाडा इ.

**मध्ययुगीनमराठी कविता आणि मराठी चित्रपटगीते यांच्यातील अनुबंध :**

मध्ययुगीन मराठी कवितेतून जो आशय गोचर होतो त्यातून मुख्यत: भक्ती आणि अध्यात्म या दोन गोष्टी केंद्रवर्ती असलेल्या दिसतात. संत आणि पंतांच्या साहित्यातून तर त्या विशेषत्वाने दिसतातच पण शाहिरांच्या अध्यात्मिक अणि भक्तीपर रचनांमधूनदेखील त्या आढळतात. या सर्वच साहित्याचा हेतू हा रंजनाबरोबरच समाजप्रबोधन असल्याचेही आपणास दिसते. सुरूवातीच्या काळातील मराठी चित्रपटगीतांचा विचार करतादेखील पहिल्या मराठी चित्रपटांची (बोलपट) मुहूर्तमेढ ही मास्टर आणि कंपनीच्या 'संत तुकाराम' या चित्रपटाने झाली हे लक्षात घ्यावे लागते. संत तुकारामांच्या अभंगाचा समावेश असलेला हा चित्रपट दि. ३० जानेवारी १९३२ रोजी पुण्याच्या आर्यन सिनेमात प्रथम प्रदर्शित झाला. (चित्रसंपदा - शशिकांत किणीकर, १९८९, पृ. ४३.) याचवेळी प्रभात फिल्म कंपनीचा 'अयोध्येचा राजा' हा चित्रपट ६ फेब्रुवारी १९३२ रोजी मुंबईच्या मॅजिस्टिक मध्ये प्रकाशित झाला. या चित्रपटासाठी गो. स. टेंबे यांनी पदे लिहिली. या चित्रपटाची सुरूवातच "जय जय राजाधिराज । हरिश्चंद्र महाराज । चिरंजीव राहोनि होवो । अखिल भुवनि मान्य ।। धृ।। ." या पदाने होते. पदाच्या अनुषंगाने अभिव्यक्तीच्या संदर्भात मध्ययुगीन संत साहित्याशी व पंडिती साहित्यातील आख्यानकाव्याशीही आपणास त्याचा संबंध जोडता येतो. संत एकनाथ चरित्रावरील 'धर्मात्मा' या १९३५ मध्ये प्रदर्शित झालेल्या चित्रपटात संत एकनाथांची पदे आणि भारूडे आलेली आहेत. श्रीखंडया या पात्राच्या तोंडून येणारे "सत्वर पाव गं मला भवानी आई रोडगा वाहीन तुला"[३] (मराठी चित्रपटाची पटकथा, डॉ. अनिल सपकाळ, प्रतिमा प्रकाशन पुणे पृ .२८, प्र.आ. एप्रिल २००५), याचे उदाहण येथे देता येईल. पुढे भक्त पुंडलिक (१९३६), ध्रुव (१९३८), भरतभेट (१९४२), रामराज्य (१९४४), भक्त पुंडलिक (१९७५) असे वेगवेगळे पौराणिक विषयावरील अनेक चित्रपट आलेत या विषयांच्या अनुषंगाने चित्रपटांमधून येणारी गाणीही भक्ती, प्रेम, अध्यात्म आणि त्याअनुषंगाने समाजप्रबोधन करणारीच असल्याचे दिसते. 'संत तुकाराम' या चित्रपटानंतर संत जनाबाई १९३८, संत चोखामेळा १९४१, संत नामदेव १९४९, जोहार मायबाप १९५०, देवकीनंदन गोपाला १९५७ या संतपटांमधूनदेखील संतांच्या अभंगानाच प्रत्यक्ष चित्रपटांतून ध्वनिचित्रमुद्रित केलेले आढळते. 'संत जनाबाई'मधील 'धरीला पंढरीचा चोर' किंवा 'संत चोखामेळा'मधील 'उस डोंगा परी' या रचनांचा उदाहरणादाखल उल्लेख करता येईल. अवधुत गुप्ते दिगदर्शित झेंडा या चित्रपटातील 'विठ्ला कोणता मी झेंडा घेऊ हाती.....' यातील विठ्ठलाला प्रश्न विचारण्याची भूमिका असो किंवा दुनियादारी या चित्रपटातील 'दगडाच्या काळजाचा दगडाचा देव तू .....' या गाण्यातून देवाला दगड ठरविण्याची भूमिका असो, नुकत्याच येवून गेलेल्या लय भारी या चित्रपटातील वारीच्या पार्श्वभूमीवर चित्रित माऊली .....माऊलीहे गीत असो किंवा नव्याने येणाऱ्या रईस प्रॉडक्शनच्या एकतारा या चित्रपटातील 'जय जय राम कृष्णहरी.....'हे भजन असो या सर्वांचाच मध्ययुगीन संत परंपरेशी असणारा अनुबंध विठ्ठलभक्तीच्या संदर्भाने आशयाशी व वारीच्या आणिआर्त-अभंगसदृश्य अभिव्यक्तीच्या संदर्भात अभिव्यक्तीच्या अनुषंगानेदेखील मान्यच करावा लागेल.

मध्ययूगीन मराठी साहित्यातील लावणी ही प्रेम आणि सौंदर्यवर्णन करणारी काव्यरचना आहे. किंबहुना लावण्याचे वर्णन करणारी म्हणून लावणी असा लावणी या वाङ्मयाच्या लक्षणाविषयी व नामाभिधाना विषयी बोलले जाते. मध्ययूगीन मराठी शाहीरी काव्याचा भाग असणारी आणि मराठी मनाला तमाशामधून रिझवणारी ही लावणी १९४७ च्या सुमारास मराठी चित्रपटांमधूनदेखील मोठया प्रमाणावर अवतरली. १९४७ मध्ये व्ही. शांताराम यांचा 'लोकशाहीर रामजोशी' हा चित्रपट आला या चित्रपटातून रामजोशींच्या लावण्यांचे ध्वनिचित्रमुद्रण करण्यात आले. या चित्रपटाला प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद मिळाल्याने पुढे 'पठ्ठे बापूराव' १९५०, 'अमर भूपाळी' १९५१, 'लोकशाहीर अनंत फंदी' १९५८, सांगत्ये ऐका १९५९, 'शाहीर परशुराम' १९६१ हे शाहीरांच्या जीवनावरील चित्रपट आलेत. मानाचा मुजरा १९६९, पाटलाचा पोर १९५१, सासर माहेर १९५४, पुनवेची रात्र १९५५, कलगीतुरा १९५५, रंगपंचमी १९६१, सवाल माझा ऐका १९६४, केला इशारा जाता जाता १९६५, गणगौळण १९६९, अशी रंगली रात्र १९७०, गणाने घुंगरू हरवलं १९७०, सोंगाड्या १९७१, पिंजरा १९७२, चंदनाची चोळी अंग अंग जाळी १९७५, देवापुढे माणूस १९८०, पैज १९८०, मानाचं कुंकू १९८१, एक होता विदुषक १९९३, असे अनेक तमाशाप्रधान चित्रपट आलेत. या चित्रपटांमधून नृत्य, लावणी, सवाल-जवाब, कलगी-तुरा अशा मध्ययुगीन शाहीरीचे दर्शन झाले. याशिवाय इतरही अनेक मराठी चित्रपटांमधून निदान एखादे तरी नृत्य लावणी गीतावर चित्रित केले गेलेले दिसते. ही परंपरा नटरंग, जोगवा या चित्रपटातील गीतांमधूनदेखील आपणास दाखवता येते. 'अप्सरा आली.....' किंवा आता 'वाजले की बारा .....'या आधुनिक चित्रपटगीतांची उदाहरणे त्यासंदर्भात सांगता येतील. कालनिहाय मराठी चित्रपटांतील लावणीचे स्वरूप हे बदलत चाललेले दिसते. काही आयटम साँगस् हीदेखील मध्ययुगीन लावणी या वाङ्मयप्रकाराशी काहीअंशी साम्यसदृश्य अशीच म्हणावी लागतील.

**शौर्य आणि इतर कथात्म उदा. ऐतिहासिक, पोराणिक आशय** : सिंहगड १९३३, बाजीप्रभू देशपांडे १९३९, मर्द मराठा १९५१, महात्मा फुले १९५४, बालशिवाजी १९८१ अशा ऐतिहासिक विषयांरील चित्रपटांमधून शोर्य आणि कथात्मक आशय आणि अभिव्यक्तीची मराठी चित्रपटगीतांची परंपरा थेट मी शिवाजीराजे भोसले बोलतोय या चित्रपटातील अफजलखान वधाच्या पोवाड्यापर्यंत सांगता येते. या गीतांची मूळंदेखील मध्ययुगीनसाहित्यातील शाहीरी वाङ्मयात आढळतात असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. याशिवाय कृष्ण चरित्रावरील शामसुदर (१९३२), कालियामर्दन (१९३५), नंदकिशोर (१९५१)या व तत्सम चित्रपटांमधूनयेणाऱ्या गौळणींच्या अनुषंगानेही मध्ययुगीन मराठी संतांच्या गौळणींशी अनुबंध दाखवता येतो.

थोडक्यात मध्ययुगीन मराठी कवितेचे मराठी चित्रपटगीतांशी असणारे अनुबंधात्मक नाते हे आशय आणि अभिव्यक्तीच्या संदर्भात दाखवता येते. आशयाच्या संदर्भात भक्ती, अध्यात्मवर्णन आणि समाजप्रबोधन, प्रेम आणि सौंदर्यवर्णन, त्यातील रंजनपरता, शौर्यवर्णन आणि इतर कथात्म उदा. ऐतिहासिक, पोराणिक आशयाच्या अनुषंगानेही ते सांगता येते. मराठी चित्रपटांमधून येणाऱ्या ओवी, अभंग, पद, आरती, स्तोत्र, भूपाळी, विरहीणी, गौळण, लावणी, कटाव, फटका, झगडा (जुगलबंदी), भारूड, श्लोक, आख्यानकाव्य,

पोवाडा इत्यादींशी मध्ययुगीन मराठी कवितेच्या अभिव्यक्तींचेच अनुकरण होतांना आढळते, किंबहुना मध्ययुगीन साहित्यातील संतांचे अभंग, ओव्या, गौळणी तसेच शाहीरांच्या लावण्या, पोवाडे, भूपाळ्या यांनादेखील चित्रपटांमध्ये स्थान देण्यात आलेले आहे. मराठी चित्रपटनिर्मितीच्या उगमापासून तर आजतागायतच्या चित्रपटांमधून हा अनुबंधात्मक प्रवाह अव्याहतपणे वाहत आहे.

**संदर्भग्रंथ सूची :**


१. मराठी चित्रपटाची पटकथा - डॉ. अनिल सपकाळ, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र. आ. एप्रिल २००५.

२. चित्रपट एक कला - विजय दीक्षित, रेणुका प्रकाशन, प्र. आ. १९७९.

३. धर्मात्मा - के. नारायण काळे, पॉप्युलर प्रकाशन, प्र. आ. १९८२

४. सिनेमाशास्त्र आणि तंत्र - कॅ. मा. कृ. शिंदे, नवमत प्रकाशन संस्था मुंबई, प्र. आ. १९५१

५. चित्रशारदा मराठी बोलपट विशेषांक - १९८२

६. अयोध्येचा राजा (पटकथा) - पटकथाकार ना. वि. कुलकर्णी, दिगदर्शक व्ही. शांताराम, १९३२.

७. महाराष्ट्र सारस्वत - वि. ल. भावे, पॉप्युलर प्रकाशन, मुबई. सहावी आवृत्ती १९०५.

८. अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास- भा. श्री. परांजपे, व्हीनस प्रकाशन, पुणे प्र. आ. १९९७.